**आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्ड :- रहिवासी व्यक्तींसाठी सुविधांचे उदारीकरण**
**एपी (डी आय आर सिरिज) परिपत्रक क्र. १०३ (मे २१, २००३)**
**भारतीय रिझर्व बँक**
**विदेशी मुद्रा नियंत्रण विभाग**
**केंद्रीय कार्यालय**
**मुंबई — ४००००१**

एपी (डी आय आर सिरिज) परिपत्रक क्र. १०३

मे २१, २००३

प्रति,
विदेशी मुद्रांचे सर्व अधिकृत व्यापारी

प्रिय महोदया / महोदय,

**आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्ड : रहिवासी व्यक्तींसाठी सुविधांचे उदारीकरण**

आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्डांच्या उपयोगासंबंधाने, सर्व अधिकृत व्यापाऱ्यांचे लक्ष, एपी (डी आय आर सिरिज) परिपत्रक क्र. ७३ दिनांक, जानेवारी २४, २००३ कडे वेधण्यात येत आहे.

२. अधिकतर उदारीकरणातील आणखी एक पाउल म्हणून अस्तित्वात असलेल्या, परवानगी प्राप्त, विदेशी मुद्रा विनियमनांनुसार, भारतातील अधिकृत व्यापाऱ्यांकडे किंवा विदेशी बँकेत खाते असलेल्या रहिवासी व्यक्तींना, परदेशी बँका आणि ख्यातनाम प्रतिनिधींकडून आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्डे मिळविण्याची मुभा आहे. भारतात किंवा परदेशात केलेला या कार्डांवरील खर्च, कार्डधारकाने ठेवलेल्या उपरिनिर्दिष्ट विदेशी चलन खात्यातून / खात्यांमधून, किंवा कार्डधारकाच्या केवळ भारतातच असलेल्या बँकेतील चालु किंवा बचत खात्यातून (असल्यास) वित्तप्रेषण करुन देता येईल. अशा कामासाठी केलेले वित्तप्रेषण, त्रयस्थ पक्षाऍवजी कार्ड देणाऱ्या परदेशातील प्रतिनिधीला भेट केले जावे.

३) येथे स्पष्ट करण्यात येत आहे की कार्ड देणाऱ्या बँकांनी घातलेली मर्यादाच लागु असेल. या सुविधेत, वित्तप्रेषणासाठी आर बी आयने कोणत्याही विशिष्ट रकमेची मर्यादा घातलेली नाही.

४) हे देखील स्पष्ट करण्यात येत आहे की, आय सी सी ज च्या उपयोग बाबत सध्या लागु असलेली बंधने, पुढील वस्तू विकत घेण्यावरही लागु होतील - लॉटरीची तिकिटे, बंदी घातलेली मासिके, शर्यतीमधील भाग, कॉल बॅक सेवांचे प्रदान इत्यादि.

५) अधिकृत व्यापाऱ्यांनी या परिपत्रकातील मजकुर त्यांच्या संबंधित ग्राहकांच्या नजरेस आणावा.

६) या परिपत्रकातील निर्देश, विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम, १९९९ (१९९९ चा ४२) च्या कलम १०(४) आणि ११(१) खाली देण्यात आले आहेत.

**आपला विश्वासू**
**ग्रेस कोशी**
**मुख्य महाव्यवस्थापक**